वर्ष - 8 । अंक -91 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आजचा रंग लाल

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 08 ऑक्टोंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## हर्षवर्धन पाटलांचा पक्ष प्रवेश अन्

# जयंत पाटलांचा गौप्यस्फोट!

### हर्षवर्धन यांच्या पक्ष प्रवेशाआधीची सांगितली 'अंदर की बात'

। इंदापूर । महाईन्यूज

**गेले अनेक दिवस मला असं वाटत होते की, हर्षवर्धन पाटील यांनी तुतारीच्या बाजूने यायला पाहिजे. त्यासाठी लोकसभेपूर्वी त्यांच्याशी मी संपर्क ही केला. मी त्यांना सांगितलं की, लोकसभा आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. तेव्हा ते म्हणाले की,आम्हाला जे शक्य आहे ते आम्ही करतो. मात्र तूर्त आम्ही इकडेच आहोत. शेवटी फोनवरून ते टाळाटाळ करायला लागल्यानंतर मी बावड्यात जाऊन सभा घेतली. बावड्यात जाऊन सभेत सांगितले की, ज्यांना टाळून तुम्ही तिकडे गेला आहात...! पुन्हा तेच तुमच्या उरावर येऊन तिकडे बसले आहेत..! त्यामुळे काही सुधारणा करून तुतारीच्या मार्गाने या असे सूचक वक्तव्य केले होते, असा गौप्यस्फोट राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटलांनी भर सभेत केला.**



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा प्रवेश सोहळा इंदापुरात झाला. यावेळी भाजप नेते व माजी मंत्री हर्षवर्धन पाटलांनी ज्येष्ठ नेते शरद पवारांच्या उपस्थितीत त्यांच्या पक्षात जाहीर प्रवेश केला. शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे,धैर्यशील मोहिते, विजयसिंह मोहिते यांच्यासह अनेक नेते मंडळी उपस्थित होते.

पुढे बोलताना पाटील म्हणाले की, पक्ष फुटल्यानंतर इंदापुरात अनेकांनी पवार साहेबांना जीवाभावाची साथ दिली. राजकारणात यशापर्यंत पोहोचण्यासाठी संख्येला खूप महत्त्व असते. त्यामुळे महाराष्ट्रात आपणाला स्थित्यंतर आपणाला दिसायला लागलेली आहेत. पुढील एक-दोन दिवसात आणखी काही निर्णय होतील. महाराष्ट्रातअशी मानसिकता झाली आहे की, पवार साहेबांच्या तुतारीच्या बाजूने आपण उभे राहिले तर आपणाला चांगले यश मिळेल. अशी मानसिकता असणारे राज्यातील अनेक जण तुतारीकडे येण्यास उत्सुक झाले आहेत.

### त्यामुळे राज्य कर्जबजारी

संकटात पवार साहेबांच्या मागे जे जे राहिले त्यांना मी अतिशय आग्रहाने सांगेन की, ही शरद पवार साहेबांच्या मागे मोठ्या संख्येने आमदार उभा करायचे आहे. महाराष्ट्राची या महायुतीच्या ताब्यातनं सुटका व्हावी, अशी प्रार्थना आम्ही रोज परमेश्वराकडे करतो. हे महाराष्ट्रातलं भ्रष्ट सरकार घालवण्यासाठी तुम्ही सगळ्यांनी ताकदीनं काम करा अनेक आमदार मतदार संघात सांगतात एक हजार कोटी आणले पाचशे कोटी आणले 800 कोटी आणले. असे सांगतात त्यामुळे राज्य कर्जबजारी झाले.

## पुण्यात चंद्रकांत पाटीलांविरोधात भाजपच्याच नेत्यानं थोपटले दंड!

### माजी नगरसेवक भाजप नेते अमोल बालवाडकर यांचे कोथरूडमध्ये जोरदार शक्तीप्रदर्शन

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यात विधानसभा निवडणुका कोणत्याही क्षणी जाहीर होण्याची शक्यता आहे. अशातच भाजपच्या पहिल्या फळीतील नेते आणि राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांचे टेन्शन कोथरूड विधानसभा मतदारसंघातील भाजपच्याच नेत्याने वाढवले आहे. माजी नगरसेवक आणि भाजप नेते अमोल बालवाडकर यांनी कोथरूडमध्ये जोरदार शक्तीप्रदर्शन करत चंद्रकांत पाटील यांच्या विरोधात आरपारची लढाई सुरु केली आहे.




अमोल बालवडकर यांनी कोथरूड विधानसभा मतदारसंघात मेळावा घेत चंद्रकांत पाटील यांच्या विरोधात दंड थोपटले आहेत. नुकतीच लोकसभा निवडणूक पार पडली. या लोकसभा निवडणुकीमध्ये मी पक्षाचे काम करण्यासाठी नागरिकांमध्ये जात होतो. त्यावेळी नागरिकांनी माझ्याकडे एक मागणी केली की, आता आपल्याला पुढे गेले पाहिजे. जसे जसे मी नागरिकांशी संवाद साधत होतो. त्या त्या वेळी नागरिक माझ्याकडे हीच मागणी करत होते. नागरिकांचे अनेक प्रश्न आहेत. ज्या प्रश्नांची सोडवणूक मी करू शकतो असे नागरिकांना वाटत होते. त्यामुळे त्यांच्याकडून अशी अपेक्षा व्यक्त होणे साहजिक होते. पुढे जाऊन कार्यकर्त्यांकडूनही अशी मागणी होऊ लागली की, आता आपण पुढे गेले पाहिजे. गेली दहा वर्ष मी पक्षाचे काम करत आहे. पक्षाची ध्येयधोरणे, योजना तळागाळात पोहोचवण्यासाठी जीवाचे रान केले आहे. हे पक्षाला देखील माहित आहे. जोपर्यंत मी नेत्यांचे काम करत होतो. त्यांच्या मागेपुढे करत होतो. तोपर्यंत माझ्याबद्दल त्यांना कुठलाही

### अजूनही वेळ गेलेली

मला पक्षातून काढून टाकण्याची धमकी दिली जात आहे. पक्षावर माझा विश्वास आहे. परंतु नेत्यांना जर त्यांचा स्वार्थ कळत असेल तर एखाद्या कार्यकर्त्यांनी स्वार्थी झाले तर त्याच्याबद्दल लगेच कारवाई पक्ष करणार का असा माझा सवाल आहे. ज्यांच्यासाठी तन मन धन लावून काम केले. पाच वर्ष ज्यांच्या पुढे मागे राहिलो. त्यांच्यासाठी रात्रीचा दिवस केला. पण या नेत्यांना जेव्हा एखादा कार्यकर्ता आमदारकी लढवण्यासाठी इच्छुक आहे असे कळते. तेव्हा हेच नेते आपल्याला धमकी देतात. तिकीट तुम्हालाच मिळणार आहे. निदान एखादा कार्यकर्ता इच्छुक आहे. तेवढे तरी राहू द्या. असे म्हणण्या इतपत या नेत्यांचे मन मोठे नसेल तर मग जनता जनार्दनाचे आशीर्वाद पाठीशी असताना कशाची भीती मनात ठेवायची असे म्हणतअमोल बालवडकर यांनी चंद्रकांत पाटील यांच्या विरोधात कोथरूडमध्ये रान पेटवण्यास सुरुवात केली आहे. आता मी पक्षाला फक्त एवढेच सांगत आहे की, अजूनही वेळ गेलेली नाही.

# अंथरुण पाहून पाय पसरावे!

## सरकारने 40 हजार कोटींची देणी ठेवली : सुप्रिया सुळे

। पुणे ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जवळ आली आहे. या निवडणुकीच्या आधीच महाराष्ट्र सरकारने मध्य प्रदेश सरकारप्रमाणे महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना आणली. ही योजना निवडणुकीपुरतीच आहे असा आरोप विरोधकांकडून सातत्याने केला जातो आहे. दरम्यान सुप्रिया सुळे यांनी एक पोस्ट केली आहे. त्यात महाराष्ट्र सरकारने तिजोरीत खडखडाट केल्याचा आरोप सुप्रिया सुळे केला आहे.**



सुप्रिया सुळेयांनी या पोस्टमध्ये म्हटलं आहे की महाराष्ट्र सरकारने कंत्राटदारांची ४० हजार कोटींची देणी बाकी ठेवली आहेत. यासाठी त्यांनी एका प्रतिथयश वृत्तपत्रातील बातमीचा फोटोही पोस्ट केला आहे. तसंच सरकारने ९६ हजार कोटींची निवडणूकपूर्व उधळपट्टी सरकारने केली असल्याचा आरोपही केला आहे. आरोप करताना त्यांनी लाडकी बहीण योजनेचं नाव थेट घेतलेलं नाही. मात्र त्यांचा अंगुलीनिर्देश त्याच योजनेकडे आहे, असं दिसून येतं आहे. सुप्रिया सुळे यांनी या पोस्टमध्ये महाराष्ट्र सरकारवर टीका केली आहे.'अंथरुण पाहून पाय पसरावे' ही म्हण शहाणी माणसं नेहमी वापरतात. शासनाच्या कारभारालाही ही म्हण लागू पडते. खर्चाचा आणि उत्पन्नाचा मेळ जमला नाही तर कर्जाच्या ओझ्याखाली दबावे लागते. सध्या महाराष्ट्र शासनाची हीच गत झालीय. निवडणूकांच्या तोंडावर सवंग घोषणा करुन भाजपाप्रणीत तिघाडी सरकारने महाराष्ट्राची तिजोरी रिकामी करुन प्रत्येकाच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर उभा करुन ठेवलाय. सध्या सरकारकडे कंत्राटदारांची ४० हजार कोटी रुपयांची देणी बाकी आहे.

हा डोंगर एकीकडे आणि दुसरीकडे ९६ हजार कोटी रुपयांची निवडणूकपूर्व उधळपट्टी सरकारने केली आहे. कंत्राटदारांची देणी थकल्यामुळे त्यांच्या संघटनेने तसेच अभियंत्यांनी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्याची घोषणा केलीय.सरकारच्या तिजोरीत खडखडाट असल्याचा हा मोठा पुरावा आहे." असा आरोप सुप्रिया सुळेंनी केला आहे.सुप्रिया सुळेंनी हे आरोप केले आहेत. या पोस्टवर लोकांनी विविध प्रतिक्रिया दिल्या आहेत. लोकसभेत सुप्रिया सुळे यांना इंदापूरमध्ये मोठा लीड मिळाला होता. सुप्रिया सुळे यांच्या विजयावर आता पक्षात येताच हर्षवर्धन पाटील यांनी मोठं वक्तव्य केले आहे. 'सुप्रिया सुळे यांच्या विजयात आमचा अदृश्य हात होता, आभार मानण्यासाठी उभा आहे,' असं वक्तव्य हर्षवर्धन पाटील यांनी केलं होतं. आता त्यानंतर सुप्रिया सुळेंनी महायुती सरकारवर आता टीका केली आहे.सरकारने ९६ हजार कोटींची निवडणूकपूर्व उधळपट्टी सरकारने केली असल्याचा आरोपही केला आहे. आरोप करताना त्यांनी लाडकी बहीण योजनेचं नाव थेट घेतलेलं नाही. मात्र त्यांचा अंगुलीनिर्देश त्याच योजनेकडे आहे, असं दिसून येतं आहे. सुप्रिया सुळे यांनी या पोस्टमध्ये महाराष्ट्र सरकारवर टीका केली आहे.'अंथरुण पाहून पाय पसरावे' ही म्हण शहाणी माणसं नेहमी वापरतात. शासनाच्या कारभारालाही ही म्हण लागू पडते.

### 96 हजार कोटीची उधळपट्टी

खर्चाचा आणि उत्पन्नाचा मेळ जमला नाही तर कर्जाच्या ओझ्याखाली दबावे लागते. सध्या महाराष्ट्र शासनाची हीच गत झालीय. निवडणूकांच्या तोंडावर सवंग घोषणा करुन भाजपाप्रणीत तिघाडी सरकारने महाराष्ट्राची तिजोरी रिकामी करुन प्रत्येकाच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर उभा करुन ठेवलाय. सध्या सरकारकडे कंत्राटदारांची ४० हजार कोटी रुपयांची देणी बाकी आहे.हा डोंगर एकीकडे आणि दुसरीकडे ९६ हजार कोटी रुपयांची निवडणूकपूर्व उधळपट्टी सरकारने केली आहे. कंत्राटदारांची देणी थकल्यामुळे त्यांच्या संघटनेने तसेच अभियंत्यांनी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्याची घोषणा केलीय.

# सनी निम्हण यांचा काँग्रेस प्रवेश अवघड?

## निष्ठावंतांचा विरोध; संधिसाधूंना उमेदवारी न देण्याचा ठराव

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**'भाजपसह अन्य पक्षांतील संधिसाधूंना ऐन वेळी पक्षात घेऊन उमेदवारी देऊ नये,' असा ठराव काँग्रेसच्या शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघाच्या बैठकीत एकमताने करण्यात आला.**

हा ठराव करून आगामी विधानसभा निवडणूक काँग्रेसकडून लढविण्यासाठी इच्छुक असलेले सनी निम्हण यांच्या पक्ष प्रवेशालाच निष्ठावंतांनी एक प्रकारे विरोध दर्शवल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे हा ठराव पाठविण्यात आला आहे. या ठरावामध्ये निम्हण यांचा थेट नामोल्लेख नसला तरी, रोख निम्हण यांच्याकडे असल्याचे सूचक इशारे देण्यात आले आहेत. महाविकास आघाडीच्या जागा वाटपात काँग्रेसला कसबा, पुणे कॅन्टोन्मेंटसह शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघ मिळण्याची शक्यता आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत शिवाजीनगरची जागा काँग्रेसला अल्प मतांनी गमवावी लागली होती. मात्र, या मतदारसंघातील काँग्रेसची ताकद वाढल्याचे मे महिन्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीत दिसून आले होते. या मतदारसंघातून काँग्रेसकडून माजी नगरसेवक दत्ता बहिरट, माजी आमदार दीप्ती चवधरी आणि मनीष आनंद इच्छुक आहेत.



मात्र, सध्या भाजपमध्ये असलेले सनी निम्हण यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याची हालचाल सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर बहिरट, चवधरी आणि मनीष आनंद यांच्या अध्यक्षतेखाली शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघाची बैठक काँग्रेस भवनात झाली. त्या वेळी 'बाहेर'च्यांच्या प्रवेशाला विरोध करण्यात आला. तसा ठराव प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे पाठविण्यात आला आहे.'काँग्रेस सत्तेमध्ये नसताना निष्ठावंतांनी आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांनी भाजपविरोधात सातत्याने संघर्ष केला. सन २०१४ मध्ये संघर्षाच्या काळात शिवाजीनगर मतदारसंघातील संधिसाधू भाजपकडे गेले.

### निष्ठावंतांना निवडणुकीत संधी द्यावी

काँग्रेसशी गद्दारी करून 'शत प्रतिशत भाजप' असा नारा त्यांनी दिला. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत जनतेने काँग्रेसला साथ दिल्याचे लक्षात आल्यानंतर संघर्षाच्या काळात काँग्रेस सोडून भाजपमध्ये गेलेले संधिसाधू पुन्हा पक्षात येण्यास इच्छुक आहेत. लोकसभा निवडणुकीचे मतदान संपताच ज्यांनी भाजप उमेदवाराच्या विजयाबद्दल अभिनंदन करणारे फलक शहरभर लावले, त्यांना पक्षात का प्रवेश द्यायचा, असा प्रश्न उपस्थित करून, काँग्रेस अडचणीत असताना संघर्षाच्या काळात प्रामाणिक आणि नि:स्वार्थीपणे साथ देणाऱ्या निष्ठावंतांना निवडणुकीत संधी द्यावी. त्याला बहुमताने विजयी केले जाईल,' असे या ठरावात नमूद करण्यात आले आहे.

## जलकुंभातून थेट सोसायटीच्या टाकीला पाणी

# चऱ्होली प्राईड वर्ल्ड सिटीतील पाणी समस्या सुटणार!

## नवीन जलवाहिनी टाकण्याचे काम प्रगतीपथावर

### आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चऱ्होली येथील प्राईड वर्ल्ड सिटीसह अन्य सोसायटींचा पाणी पुरवठा सक्षम होणार असून, महानगरपालिकेच्या जलकुंभातून थेट सोसायटीच्या अंडरग्राउंड वॉटर टँकला पाणी देण्यात येणार आहे. त्यासाठी नवीन जलवाहिनी टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे, अशी माहिती महापालिका पाणी पुरवठा विभागाकडून मिळाली.**







पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाकडून चऱ्होली आणि परिसरातील सोसायटींना पाणी पुरवठा सक्षम करण्यासाठी चिखली जलशुद्धीकरण केंद्रातून पाणी पुरवठा केला जातो. पूर्वी टाकलेल्या जुन्या जलवाहिनीद्वारे प्राईड वर्ल्ड सिटी, ब्रॉकलिन, लॉग हेडलाईन, किंग्ज बेरी, मेन हायटेन अशा सोसायटींना कमी दाबाने पाणी पुरवठाची समस्या आहे.

सुमारे ४ हजार सदनिकाधारका आणि २० हजार लोकवस्ती असलेल्या या भागात पाणी पुरवठा सुमारे १ किलोमीटर लांब असलेल्या जलकुंभातून केला जात आहे. सदर पाणी पुरवठा सक्षम करण्यासाठी कार्यवाही करावी, यासाठी आमदार महेश लांडगे यांनी पाठपुरावा केला आहे. त्याला यश मिळाले.

> “ समाविष्ट गावांमध्ये वाढती लोकसंख्या आणि पाण्याची मागणी याच्या तुलनेमध्ये जुन्या जलवाहिनी बदलून नवीन टाकण्याचे काम प्रशासनाकडून मोठ्याप्रमाणात हाती घेतले आहे. कारण, जुन्या जलवाहिन्यांची क्षमता, पाणी गळती आणि दुरस्ती याबाबत अनेक तक्रारी येतात. प्राईड वर्ल्ड सिटी सोसायटीसह लगतच्या भागातील गृहप्रकल्पांना दुसऱ्या टाकीतून पाणी पंपिंग करावे लागत होते. आता थेट सोसायटीच्या टाकीपर्यंत जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. त्यामुळे प्राणी प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.
> **–महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

दरम्यान, महानगरपालिका पाणी पुरवठा प्रशासनाने थेट सोसायटींच्या टाकीमध्ये पाणी पुरवठा व्हावा.

या करिता इंटरलाईन कनेक्शन व नवीन मुख्य जलवाहिनी टाकण्याचे काम करण्यात आले. त्याचे दोन-तीन दिवसांत टेस्टिंग होणार असून, त्यानंतर नवीन जलवाहिनी कार्यान्वयीत करण्यात येणार आहे. त्यामुळे प्राईड वर्ल्ड सिटीसह अन्य सोसायटींचा पाणीपुरवठा सुरळीत होईल, असा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे.

---

# जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ शाळेमध्ये नवरात्र व भोंडला उत्साहात साजरा

### विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा परिधान करून आनंद लुटला

। पिंपरी । प्रतिनिधी :
महाईन्यूज

पिंपरी : भारतीय संस्कृती विविध परंपरांनी नटलेली आहे. भारतीयांनी ही या संस्कृती व परंपरांचे जतन व संवर्धन केल्याने युगानुयुगे या परंपरा टिकून आहेत. सर्वांना सोबत घेऊन सामूहिकता, एकता व समतेचे संस्कार आपोआप मनात रुजविणारा लोकोत्सव म्हणजे नवरात्रात खेळला जाणारा भोंडला व गरबा. जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ शाळेमध्ये नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने शाळेचे प्राचार्य डॉ.ज्ञानेश्वर गाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली भोंडला, दांडिया व गरबा आयोजित करण्यात आला. या विशेष प्रसंगी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा परिधान करून भोंडला, गरबा व दांडिया नृत्याचा आनंद लुटला.



कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे संचालक ह.भ.प राजू महाराज ढोरे, प्राचार्य डॉ .ज्ञानेश्वर गाडगे, मुख्याध्यापिका स्नेहल पगार व समन्वयिका मयुरी मुळूक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन, हत्ती ( हादगा) व दुर्गा मातेच्या पुजनाद्वारे करण्यात आली. विद्यार्थ्यांनी सुंदर गरबा नृत्य सादर करून शाळेत एकात्मता आणि आनंदाचे वातावरण निर्माण केले, ज्यामुळे सर्व विद्यार्थ्यांमध्ये एक नवीन ऊर्जा संचारली. कार्यक्रमाची विशेष बाब म्हणजे दांडिया नृत्यात केवळ विद्यार्थीच नाही तर शिक्षकांनीही सहभाग घेतला आणि संपूर्ण वातावरण आनंदाने भरून गेले. नृत्याबरोबरच देवीच्या भक्तिमय गीतांनी संतपीठ परिसर भक्तिमय झाला.

समारोपाच्या वेळी प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गाडगे यांनी सर्वांचे अभिनंदन करून अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे महत्त्व विशद केले व आपली संस्कृती व परंपरा जिवंत ठेवण्याचा हा उपक्रम असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीत शिक्षिका नेहा नाफडे यांनी केले व आभार प्रदर्शन संगीत शिक्षक विवेक भालेराव यांनी मानले.

---

# पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहराध्यक्ष पदी योगेश बहल यांची निवड

। पिंपरी । प्रतिनिधी :
महाईन्यूज

पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या शहराध्यक्षपदी माजी महापौर योगेश योगेश बहल यांची आज निवड करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी अजित गव्हाणे यांनी पक्षाचा राजीनामा देत शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. तेव्हापासून शहराध्यक्ष पद रिक्त होते. दरम्यान आज अजित पवार यांच्या उपस्थितीत योगेश बहल यांची शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली. बहल यांच्या निवडीनंतर पक्षाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी आनंद व्यक्त केला आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा अजितदादा पवार यांनी आज पिंपरी चिंचवड शहरातील माजी नगरसेवक व पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीत अध्यक्षपदाचा मुद्दा चर्चेत आल्यानंतर सर्वानुमाते योगेश बहल यांची शहराध्यक्षपदी निवड जाहीर करण्यात आली आहे.

योगेश बहल हे राष्ट्रवादीचे निष्ठावंत व अजितदादा यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. त्यांनी यापूर्वी पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर पद भूषविलेले आहे. आगामी विधानसभा निवडणूक आणि महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर योगेश बहल यांची निवड महत्वपूर्ण मानली जात आहे.



## भूमिका

# उद्धव ठाकरेंपुढे ‘स्ट्राइक रेट’चं आव्हान...



**तिसऱ्या आघाडीचा येणाऱ्या विधानसभा निवडणुकीवरील परिणाम यावर बरीच साधकबाधक चर्चा चालू आहे. तिसरी आघाडी प्रसवली आहे कोल्हापूरचे संभाजीराजे, शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी व प्रहारचे बच्चू कडू यांनी. यांची पार्श्वभूमी तपासली तर काय दिसून येतं?**

तेव्हाच्या राष्ट्रवादीतल्या साताऱ्याच्या उदयनराजेंना ‘बॅलन्स’ करायला फडणवीसांनी छत्रपती घराण्यातील संभाजीराजेंना भाजपतर्फे खासदारकी दिली.ती मुदत संपल्यावर त्यांना भाजपने वाऱ्यावर सोडलं. ते मग उद्धव ठाकरेंकडे खासदारकीसाठी गेले. ठाकरेंनी स्वाभाविकच संभाजीराजेंना शिवसेना प्रवेशाची अट घातली. ती संभाजीराजेंनी अव्हेरली. यावेळी त्यांना डावलून पवारांनी त्यांच्या पिताजींना, आदरणीय शाहू महाराजांना (ठाकरेंना कोल्हापूरची जागा सोडण्यासाठी राजी करून मग) काँग्रेसचं तिकीट दिलं आणि ते निवडूनही आले. उदयनराजे भाजपत आले, त्यामुळे भाजपच्या दृष्टीने संभाजीराजेंची उपयुक्तता संपली. राजू शेट्टींना लोकसभेच्या झालेल्या निवडणुकीत हातकणंगलेतून स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे निवडणूक लढवायची होती आणि तिथे मविआतर्फे उबाठा सेनेचा दावा असल्यामुळे त्यांचा पाठिंबा हवा होता. पण शेट्टींनी मशाल चिन्हावरच निवडणूक लढवावी म्हणून उद्धव ठाकरे अडून बसले. या ठाकरेंच्या चुकीच्या निर्णयाने सीट तर शिंदेंसेनेला गेलीच, पण राजू शेट्टीही विरोधात गेले.बच्चू कडू यांचा प्रकार वेगळाच आहे. शिवसेना फुटली तेव्हा बच्चू कडू शिंदे गटात सामील होताना म्हणाले, ‘फडणवीसांचा फोन आला म्हणून गुवाहाटीला आलो’. त्यानंतर लोकसभेला त्यांनी अमरावती मतदारसंघात आपला उमेदवार उभा केला, भाजपच्या उमेदवारांविरुद्ध प्रचार केला. तिथे मविआचा उमेदवार निवडून आला. त्यामुळे बच्चू कडू उद्या काय करतील, हे त्यांचं त्यांनाही सांगता येत नाही. छत्रपती संभाजीराजे, राजू शेट्टी व बच्चू कडू हे असे आपापल्या राजकीय स्वार्थापोटी एकत्र आले आहेत. या तिघांचाही राग उद्धव ठाकरे व शरद पवारांवर आहे. आता असं गृहीतक मांडलं जातं की या तिघांच्या तिसऱ्या (कथित) आघाडी चा फायदा भाजपप्रणीत महायुतीला होईल, पण हेच मुळात चुकीचं वाटतं. मुळात यांना जनाधार किती मिळेल हाच लाखमोलाचा प्रश्न आहे. कारण वंचित बहुजन आघाडी वेळोवेळी भाजप विरोधकांशी एकत्रित निवडणूक लढवायची चर्चा करते, पण शेवटी ती ‘फिसकटवून’ आपले स्वतंत्र उमेदवार उभे करते. यावेळी तेही तिसऱ्या आघाडीची गोष्ट करताहेत, व त्याचबरोबर आपले मतदारसंघ व उमेदवारही जाहीर करताहेत. वंचितला अपयश येतं, यापेक्षा महत्त्वाचं म्हणजे दर निवडणुकीत त्यांचा मताचा टक्का घटतो आहे. याचाच साधा सरळ अर्थ आहे की मतदार शहाणे होताहेत आणि त्यामुळेच मतांच्या फाटाफुटीला आळा बसत चाललाय. तिसऱ्या आघाडीबाबत हे होणारच नाही असं नाही. मात्र काही ठिकाणी अन्याय झाल्यामुळे महायुती व महाआघाडी सोडून तिसरा उमेदवार निवडून येतो, हे आपण सांगली लोकसभेच्या निकालात पाहिलं आहे. पण ते अगदीच विरळा, त्यामुळे त्याचा विचार इथे नको. अशी परिस्थिती असताना तिसऱ्या आघाडीचा घाट का? तर मुख्यत्वे एकेकाचा अहंभाव हेच कारण असावं. प्रस्थापित पक्षात यांना मानाचं स्थान मिळावयाची शक्यता दूरान्वयानेच. याचबरोबर सत्ताधारी महायुतीची दारुण परिस्थिती. त्यांना पुन्हा सत्तेत येण्याची शक्यता नगण्य असल्याचं वाटल्यामुळे महायुती काहीही करायला तयार आहे. त्याचाच परिपाक म्हणजे ‘लाडक्या’ योजना! पण एकाच टोपलीत ही सगळी अंडी असल्यामुळे ती सगळीच फुटण्याचा धोकाही तेवढाच आहे, म्हणून तिसऱ्या आघाडीला उभं करणं हा प्लॅन बी. तो या आशेवर की ते महाआघाडीची मतं खातील! महायुतीचा विचार केला तर भाजपने ५५ चा आकडा ओलांडला तरी ते जिंकले समजायला हरकत नसावी. शिंदेसेनेला शिंदे यांच्या सध्याच्या ’करिष्म्यावर’ चांगला स्ट्राईक रेट मिळाला तरीही ते ६०-६५ पुढे जाऊ शकत नाहीत. म्हणजे अजितदादांनी किमान २५ तरी जागा मिळवायला हव्यात बहुमताचा आकडा गाठण्यासाठी. अर्थात हे अनुमान इतकं काठावरचं आहे की एकही आकडा चुकला की कपाळमोक्षच. अर्थात यावेळी अपक्ष यात किंगमेकरची भूमिका बजावू शकतात.

## प्रासंगिक »

### सज्जनांचा श्राद्धदिन!

***पश्चिम आशियातील नरसंहारातून नेतान्याहू यांची बेमुर्वतखोरी जितकी दिसते त्यापेक्षा अधिक अमेरिका नामे महासत्तेची अगतिकता प्रकर्षाने उघड होते...***

गतवर्षी याच दिवशी (७ ऑक्टोबर) हमास या दहशतवादी संघटनेच्या आततायी नेतृत्वाने इस्रायलवर अत्यंत निंदनीय नृशंस असा हल्ला केला आणि स्वत:च्या पायावर धोंडा नव्हे, तर कुऱ्हाड मारून घेतली. त्यात हजारांहून अधिक निरपराध यहुदी हकनाक मारले गेले. त्यामुळे मुळात युद्धखोर प्रवृत्तीच्या, देशांतर्गत राजकारणात गंभीर संकटात सापडलेल्या इस्रायली पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांना आयतीच संधी मिळाली. त्याचे वर्णन ‘लोकसत्ता’ने गतवर्षीच्या संपादकीयात ‘बिबिंचा पुलवामा’ असे केले. ते किती सार्थ होते आणि आहे हे हत्याधुंद नेतान्याहू यांच्या सध्याच्या परिस्थितीवरून ध्यानी येईल. तरीही नेतान्याहू यांची भूक शांत होताना दिसत नाही आणि इस्रायलची समस्याही मिटताना दिसत नाही. जे झाले, जे सुरू त्यावर ‘लोकसत्ता’ने गेल्या वर्षभरात वेळोवेळी भाष्य केले.

येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये मतदान करताना मतदारांनी कोणत्या मुद्द्यांचा विचार करायला हवा, आपल्या लोकप्रतिनिधींनी गेल्या पाच वर्षांत कोणती कामे करणे अपेक्षित होते, ती त्यांनी केली आहेत का याचा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लेखाजोखा... ‘मावळतीचे मोजमाप’ या नव्या सदरात आजपासून...

# मावळत्या विधानसभेने लोकहितासाठी काय केलं

लवकरच नव्या, १५ व्या महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जाहीर होईल. या वेळी मावळत्या विधानसभेने लोकहितासाठी काय काम केलं याचा आढावा घेणं आवश्यक. संपर्क या संस्थेने महाराष्ट्राच्या १४ व्या विधानसभेचा (२०१९-२४ या काळातल्या १४ व्या विधानसभेची १२ अधिवेशनं, कामकाजाचे एकूण दिवस १३१) उभा-आडवा अभ्यास केला. आमदार विधानसभा सभागृहात कोणती कामगिरी करतात हा फार दुर्लक्षित राहिलेला विषय आहे. संपर्कने २०१५ पासून ते अभ्यासायला सुरुवात केली आहे. महाराष्ट्रात १५ व्या विधानसभेसाठी निवडणूक होऊ घातली आहे. १४ व्या मावळत्या विधानसभेत उपस्थित झालेले ३,७९१ तारांकित प्रश्न आणि २,१३० लक्षवेधी सूचना, दोन्ही मिळून ५,९२१ प्रश्न आम्ही अभ्यासले. एक प्रकारे, विधानसभेचं हे परीक्षण, ‘ऑडिट’! कोविडमुळे तीन अधिवेशनं रद्द केली गेली. आणि अर्थसंकल्पीय, २०२४ अधिवेशनात




प्रश्नोत्तरांचा तास रहित केला होता. यामुळे मागील विधानसभेच्या तुलनेत या विधानसभेत आमदारांना प्रश्न उपस्थित करण्याची संधी कमी मिळाली. १४ व्या विधानसभेतल्या अधिवेशनांचे विधिमंडळाच्या वेबसाइटवरचे सर्व उपलब्ध अहवाल आम्ही अभ्यासले. प्रश्नांचं वर्गीकरण केलं. राज्यातल्या सर्व २८८ आमदारांनी मांडलेल्या प्रश्नांविषयीची निरीक्षणं मांडली. असाच अभ्यास, आम्ही १३ व्या विधानसभेचाही (२०१४ ते १९) केला असल्याने, तुलना करण्यासाठी, तेव्हाची निरीक्षणंही आमच्या हाती आहेत.एकूण ५,९२१ प्रश्न भागिले २८८ मतदारसंघ केल्यास सरासरी वीस प्रश्न एका मतदारसंघातून पाच वर्षांत विचारले गेले... म्हणजे वर्षातून फक्त चार. प्रश्न कोणते विचारले, हे नंतर बघू. पण ही संख्या किरकोळ ठरत नाही का? प्रश्नसंख्येवरून आमदारांचे अग्रक्रम कळतात. महिला-बालक यांच्यासंबंधीचे प्रश्न दोन-अडीच टक्क्यांच्या पुढे जात नाहीत, याचा अर्थ ते आमदारांसाठी प्राधान्याचे नाहीत, असा होतो. वृत्तपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, नागरिकांनी/ संस्थांनी दिलेली निवेदनं, मतदारसंघात घडलेल्या घटना यावरून सहसा आमदारांकरवी प्रश्न तयार केले जातात. त्यामुळे प्रश्नांमध्ये प्रासंगिकता जास्त असते. प्रश्नोत्तरांत, चर्चांत सखोलतेचा, व्याप्तीचा अभाव राहतोबालकुपोषणाचे प्रश्न अगदी सामान्य झाल्यासारखे पुन्हा पुन्हा उपस्थित होत राहतात. त्यामुळे लोकप्रतिनिधींना याबद्दल खरोखरीची आस्था आहे का, अशी शंका वाटावी. जवळपास प्रत्येक जिल्ह्यातून शासकीय रुग्णालयात सिटी स्कॅन मशीनची, ट्रॉमा केअर सेंटरची मागणी आमदार करतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# आदिवासी कुठंही उडी मारु शकतो!

## महाराष्ट्राच्या राजकारणाची सर्कस झाली : नरहरी झिरवाळ

।बारामती।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज पुण्यातील मराठी साहित्य परिषदेला संबोधित केलं. मराठी साहित्य परिषदेच्या बोधचिन्हाचे राज ठाकरे यांच्या हस्ते अनावरण झाले. यावेळी त्यांनी आजच्या साहित्यिक आणि कवींवर नाराजी व्यक्त करत राजकारण्यांवरही टीका केली. महाराष्ट्राच्या राजकारणाची सर्कस झाली आहे असं राज ठाकरे म्हणाले होते. नरहरी झिरवाळ यांनी राज ठाकरेंना उत्तर दिलंय.**



“आज महाराष्ट्राचा राजकारणाचा खेळ झाला आहे, महाराष्ट्राची सर्कस झाली आहे. कोणी विदुषकी चाळे करतंय, कोणी मंत्रालयात जाळ्यांवर उड्या मारतंय. खरंतर महाराष्ट्रातील राजकारणात असे लोक आहेत, ज्यांनी जाळ्या नसलेल्या इमारतींवरून उड्या मारायला लावल्या पाहिजेत. पण ज्या प्रकारची भाषा राजकारणात वापरली जातेय, कशाला काही धरबंध नाही, अशा गोष्टी महाराष्ट्रात होत आहेत. तिथं त्यांचे कान धरून शिकवणं, समजावणं हे तुमचं सर्वांत मोठं कर्तव्य आहे, असं मी मानतो. त्या अधिकारवाणीने तुम्ही बोलू शकता असं राज ठाकरे म्हणाले होते. याच राज ठाकरेंच्या टीकेबाबत नरहरी झिरवाळ यांना विचारलं असता त्यांनी यावर खास शैलीत उत्तर दिलं आहे.“राजकारणाची सर्कस झाली असेल तर मी सर्कस करो किंवा तमाशा करो, पण माझ्या आदिवासी बांधवांना न्याय मिळाला पाहिजे. ज्या काही १७ संवर्गांना आजपासूनच आदेश दिला आहे, कुणाला नाटक दिसो, सर्कस दिसो काहीही दिसो. ज्या रखडलेल्या गोष्टीही पुढे जात आहेत. का आल्या नव्हत्या इतक्या दिवसांत? मी आंदोलन राजकारणासाठी केलं असेन किंवा कुठला हेतू ठेवून केलं असेल. पण मुलांचं हित तर होतं आहे. मी जाळी नसलेल्या ठिकाणीही उडी मारु शकतो, मी आदिवासी आहे. आदिवासी कुठंही उडी मारु शकतो. जाळी होती हे खरं आहे. ज्यांना कुणाला प्रयोग करायचा असेल तर डबल जाळी लावून फक्त उडी मारुन दाखवा तेवढ्या उंचीवरुन. राज ठाकरेंना आव्हान देतो असं नाही, जे कुणीही बोलतात त्यांना आव्हान देतो. समाजाचं भलं होणार असेल तर मीच नाही अनेक लोक उड्या मारतील.” असं उत्तर झिरवाळ यांनी दिलं आहे.राज्य सरकारने धनगड नावाने काढण्यात आलेले जातीचे दाखले रद्द केले आहेत. धनगर समाजाकडून या निर्णयाचं स्वागत होत आहे. सरकारच्या या निर्णयाला आव्हान देणार असल्याचं नरहरी झिरवळ यांनी म्हटलंय. त्यामुळे, राष्ट्रवादी सत्तेत असलेल्या महायुती सरकारला नरहरी झिरवाळ यांचा घरचा आहेर आहे. तसेच, आमच्यातील बोगस दाखले देखील रद्द करा, आमची मागणी होती. तेव्हा मात्र सरकारने हे आमच्या अधिकारात नसल्याचं सांगत हात झटकले. मग आता सरकारने हा निर्णय कसा घेतला?, असा सवाल केला आहे. तर, याबाबत उद्याच मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आणि जाब विचारणार असल्याचंही झिरवाळ यांनी म्हटलं आहे. राज ठाकरेंच्या टीकेबाबत नरहरी झिरवाळ यांना विचारलं असता त्यांनी यावर खास शैलीत उत्तर दिलं आहे.

“राजकारणाची सर्कस झाली असेल तर मी सर्कस करो किंवा तमाशा करो, पण माझ्या आदिवासी बांधवांना न्याय मिळाला पाहिजे. ज्या काही १७ संवर्गांना आजपासूनच आदेश दिला आहे, कुणाला नाटक दिसो, सर्कस दिसो काहीही दिसो. ज्या रखडलेल्या गोष्टीही पुढे जात आहेत. का आल्या नव्हत्या इतक्या दिवसांत? मी आंदोलन राजकारणासाठी केलं असेन किंवा कुठला हेतू ठेवून केलं असेल. पण मुलांचं हित तर होतं आहे. मी जाळी नसलेल्या ठिकाणीही उडी मारु शकतो, मी आदिवासी आहे. आदिवासी कुठंही उडी मारु शकतो. जाळी होती हे खरं आहे. ज्यांना कुणाला प्रयोग करायचा असेल तर डबल जाळी लावून फक्त उडी मारुन दाखवा तेवढ्या उंचीवरुन.

### नरहरी झिरवाळ यांचा घरचा आहेर

राज ठाकरेंना आव्हान देतो असं नाही, जे कुणीही बोलतात त्यांना आव्हान देतो. समाजाचं भलं होणार असेल तर मीच नाही अनेक लोक उड्या मारतील.” असं उत्तर झिरवाळ यांनी दिलं आहे.राज्य सरकारने धनगड नावाने काढण्यात आलेले जातीचे दाखले रद्द केले आहेत. धनगर समाजाकडून या निर्णयाचं स्वागत होत आहे. सरकारच्या या निर्णयाला आव्हान देणार असल्याचं नरहरी झिरवळ यांनी म्हटलंय. त्यामुळे, राष्ट्रवादी सत्तेत असलेल्या महायुती सरकारला नरहरी झिरवाळ यांचा घरचा आहेर आहे.

# देवा भाऊ जो बोलता है, वो करता है!

## फडणवीस यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन

।बारामती।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे राज्यात अनेक राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सर्वच नेत्यांनी आपआपल्या मतदारसंघात मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीचे अनेक नेते राज्यातील विविध मतदारसंघात दौरे करत सभा आणि मेळावे घेत आहेत. विविध मतदारसंघात मेळावे घेत निवडणुकीची रणनीती आखली जात आहे.**



यातच सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत. या पार्श्वभूमीवर आज राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांचे भूमिपूजन पार पडले. या कार्यक्रमात बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी एक डायलॉग मारत विरोधकांना इशारा दिला आहे. “देवा भाऊ जो बोलता है, वो करता है, और जो नहीं बोलता वो डेफिनेटली करता है”, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं. त्यांच्या या विधानाची राज्याच्या राजकीय वर्तुळाच जोरदार चर्चा रंगली आहे.त्यावेळी मी तुम्हाला सांगितलं होतं की, १०६ आमदार निवडून द्या. सरकारचा करेक्ट कार्यक्रम करतो. मग सरकारचा करेक्ट कार्यक्रम केला ना? तुम्ही मला १०६ वा आमदार दिला आणि आपलं सरकार, महायुतीचं सरकार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात आणलं.

### आपण अनेक योजना सुरु केल्या

एक लक्षात ठेवा देवा भाऊ जो बोलता है, वो करता है, और जो नहीं बोलता वो डेफिनेटली करता है”, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.“तुम्ही समाधान आवताडे यांना एक मत दिलं आणि त्यांनी देखील तुमचं समाधान करून दाखवलं. युतीच्या सरकारमध्ये आपण अनेक योजना सुरु केल्या. मात्र, मध्यंतरी १५ वर्ष या सर्व योजना बंद होत्या. लोक म्हणायचे पाणी पोहचू शकत नाही. मात्र, आपलं सरकार आल्यानंतर केंद्र सरकारची मदत घेतली आणि सोलापूर सांगली आणि सातारा जिल्ह्यातील दुष्काळ हा मी भूतकाळ करून दाखवेन.

# तर मी भाजपाचा प्रचार करेन!

## आपण सगळेजण मिळून ही लढाई लढुया : अरविंद केजरीवाल

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज



**दिल्लीचे माजी मुख्यमंत्री व आम आदमी पार्टीचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी रविवारी (६ ऑक्टोबर) छत्रसाल स्टेडियमवर जनता न्यायालयाचं आयोजन केलं होतं. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी भारतीय जनता पार्टी, पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार हल्लाबोल केला. तसेच ते थेट पंतप्रधान मोदी यांना आव्हान देत म्हणाले, "आज मी नरेंद्र मोदींना एक आव्हान देऊ इच्छितो.**

फेब्रुवारी २०२५ मध्ये दिल्ली विधानसभेची निवडणूक होणार आहे. दिल्लीच्या निवडणुकीपूर्वी त्यांनी २२ राज्यांमध्ये वीज मोफत केली तर मी दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाचा प्रचार करेन". अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीत वाढलेल्या गुन्हेगारीच्या मुद्द्यावरून केंद्र सरकारला धारेवर धरलं. त्यांनी दिल्लीतल्या गुन्हेगारीच्या घटनांची आकडेवारी मांडली आणि म्हणाले, दिल्लीतलं वातावरण गंभीर आहे. इथल्या रस्त्यांवर दिवसाढवळ्या गोळीबाराच्या घटना घडत आहेत. ठिकठिकाणी गुंडांनी त्यांचे अड्डे (तळ) बनवले आहेत. ९० च्या दशकात मुंबईची जशी अवस्था होती अगदी तशीच अवस्था आज दिल्लीची करून ठेवली आहे. गुन्ह्यांची कित्येक प्रकरणं पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचतच नाहीत. अनेक प्रकरणांमध्ये पोलीस एफआयआर दाखल केले जात नाहीत. सामान्य जनता दिल्लीत सुरक्षित नाही. त्यांचं सुरक्षित जगणं कठीण झालं आहे. दिल्ली पोलीस भाजपासाठी काम करत आहेत.बस मार्शलच्या मुद्द्यावरून भाजपावर हल्लाबोल करत केजरीवाल म्हणाले, राजकारणात यायच्या आधी मी १० वर्षे येथील झोपडपट्ट्यांमध्ये काम केलं आहे. दिल्लीतली बससेवा मोडकळीस आली आहे. एखादी महिला बसमध्ये चढते आणि तिला बसमध्ये जागा मिळत नसल्यामुळे ती उभी राहते. त्यानंतर तिच्याशी कसा व्यवहार होतो? महिला सुरक्षेचा मुद्दा आपल्यासमोर आहेच. याबाबत मी तीन-चार वेळा उपराज्यपालांशी चर्चा केली. त्यांना म्हणालो, बस मार्शलना थांबवू नका, महिला सुरक्षेसाठी मार्शल गरजेचे आहेत. ही सर्व गरीब मुलं आहेत. मार्शल म्हणून काम करतात आणि त्यांना महिन्याला १५ हजार रुपये मिळत होते. मात्र भाजपाने हे सगळं बंद केलं. कारण भाजपा गरीबविरोधी आहे.यावेळी केजरीवाल दिल्लीमधील जनतेला आश्वासन देत म्हणाले, "मी आता तुमच्यासमोर आलो आहे. तुमची सगळी कामं करेन. तुमच्या नोकऱ्या तुम्हाला परत करेन, पगारही द्यायला लावेन". कामावरून काढून टाकलेल्या बस मार्शलना केजरीवाल म्हणाले, "तुमचा थोरला भाऊ परत आला आहे. आता आपण सगळेजण मिळून ही लढाई लढुया". दिल्लीच्या निवडणुकीपूर्वी त्यांनी २२ राज्यांमध्ये वीज मोफत केली तर मी दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाचा प्रचार करेन". अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीत वाढलेल्या गुन्हेगारीच्या मुद्द्यावरून केंद्र सरकारला धारेवर धरलं. त्यांनी दिल्लीतल्या गुन्हेगारीच्या घटनांची आकडेवारी मांडली आणि म्हणाले, दिल्लीतलं वातावरण गंभीर आहे. इथल्या रस्त्यांवर दिवसाढवळ्या गोळीबाराच्या घटना घडत आहेत. ठिकठिकाणी गुंडांनी त्यांचे अड्डे (तळ) बनवले आहेत. ९० च्या दशकात मुंबईची जशी अवस्था होती अगदी तशीच अवस्था आज दिल्लीची करून ठेवली आहे. गुन्ह्यांची कित्येक प्रकरणं पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचतच नाहीत. अनेक प्रकरणांमध्ये पोलीस एफआयआर दाखल केले जात नाहीत. सामान्य जनता दिल्लीत सुरक्षित नाही. दिल्ली पोलीस भाजपासाठी काम करत आहेत.बस मार्शलच्या मुद्द्यावरून भाजपावर हल्लाबोल करत केजरीवाल म्हणाले, राजकारणात यायच्या आधी मी १० वर्षे येथील झोपडपट्ट्यांमध्ये काम केलं आहे.

### मी तुमची सगळी कामं करेन

दिल्लीतली बससेवा मोडकळीस आली आहे. एखादी महिला बसमध्ये चढते आणि तिला बसमध्ये जागा मिळत नसल्यामुळे ती उभी राहते. त्यानंतर तिच्याशी कसा व्यवहार होतो? महिला सुरक्षेचा मुद्दा आपल्यासमोर आहेच. याबाबत मी तीन-चार वेळा उपराज्यपालांशी चर्चा केली. त्यांना म्हणालो, बस मार्शलना थांबवू नका, महिला सुरक्षेसाठी मार्शल गरजेचे आहेत. ही सर्व गरीब मुलं आहेत. मार्शल म्हणून काम करतात आणि त्यांना महिन्याला १५ हजार रुपये मिळत होते. मात्र भाजपाने हे सगळं बंद केलं. कारण भाजपा गरीबविरोधी आहे.यावेळी केजरीवाल दिल्लीमधील जनतेला आश्वासन देत म्हणाले, "मी आता तुमच्यासमोर आलो आहे. तुमची सगळी कामं करेन.

# "गाय आमची माता, जनावरांच्या यादीतून वगळा"

## अविमुक्तेश्वरानंद यांनी मोदी सरकारकडे केली मागणी

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज





**बद्रीनाथ ज्योतिर्मठ पीठाचे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी केंद्र सरकारला विनंती केली आहे की "गायीला जनावरांच्या श्रेणीतून वगळा". ते म्हणाले, "सरकारने बनवलेल्या जनावरांच्या यादीत गायीचा समावेश आहे. परंतु, सनातन धर्मात गायीला मोठी प्रतिष्ठा आहे. गायीला आम्ही माता म्हणून पूजतो. त्यामुळे गायीला जनावर म्हणणं चुकीचं आहे".**

अविमुक्तेश्वरानंद यांनी गौ प्रतिष्ठा ध्वज स्थपना यात्रेचं आयोजन केलं आहे. ही यात्रा नुकतीच ओडिशात दाखल झाली आहे. यावेळी त्यांनी गायीला जनावरांच्या यादीतून वगळण्याची मागणी केली. स्वामी अविमुक्तेश्वरानंद म्हणाले, "गायीला संरक्षण मिळवून देणे व गायींची सेवा करणे हा या यात्रेचा उद्देश आहे". ओडिशात दाखल झाल्यावर अविमुक्तेश्वरानंद यांनी तिथल्या प्रसिद्ध लिंगराज मंदिरात जाऊन पूजा केली, तसेच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, "मी येथे गौ प्रतिष्ठा ध्वज प्रतिष्ठापना यात्रेसाठी आलो आहे. गोमातेचं संरक्षण व संवर्धनासाठी सरकारने कायदा करावा, ही आमच्या या यात्रेची प्रमुख मागणी आहे. त्यासाठीच आम्ही ही यात्रा काढली आहे. सरकारच्या यादीत गायीला प्राण्यांच्या श्रेणीत ठेवण्यात आलं आहे. परंतु, भारतीय सभ्यता व संस्कृतीत गायीला देवी म्हटलं गेलं आहे. गायीला माता म्हणत तिचं महत्त्व सांगितलं आहे. सनातन धर्म मानणारे गायीला माता म्हणतात. त्यामुळे गायीला प्राणी म्हणणं हा सनातन धर्माचा, सनातन धर्माच्या अनुयायांचा अपमान आहे.

आपली परंपरा आपण पुढे न्यायला हवी. त्याचाच एक भाग म्हणून सरकारने जारी केलेल्या जनावरांच्या यादीतून गायीला वगळावं लागणार आहे.स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती म्हणाले, "गोमातेचं संरक्षण आणि संवर्धनासाठी सरकारने कायदा केल्यानंतर लोकांनाही याचं व सनातन धर्माचं गांभीर्य समजेल.

### गायीला आम्ही माता म्हणून पूजतो

स्वामी अविमुक्तेश्वरानंद हे गेल्या अनेक वर्षांपासून गायींचं संरक्षण व संवर्धन करण्यासाठी काम करत आहेत. त्यांचं काम अजूनही चालूच आहे. केंद्र सरकार कायदा करत नाही तोवर हे काम करत राहणार असल्याचं त्यांनी सांगितलं आहेअविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी केंद्र सरकारला विनंती केली आहे की "गायीला जनावरांच्या श्रेणीतून वगळा". ते म्हणाले, "सरकारने बनवलेल्या जनावरांच्या यादीत गायीचा समावेश आहे. परंतु, सनातन धर्मात गायीला मोठी प्रतिष्ठा आहे. गायीला आम्ही माता म्हणून पूजतो.



# नवरात्रीचा सहावा दिवस कात्यायनी मातेला समर्पित!

शारदीय नवरात्रीचा सहावा दिवस. या दिवशी दुर्गा मातेचे सहावे रूप कात्यायनी देवीची पूजा करण्याची परंपरा आहे. असे म्हटले जाते की कात्यायनी मातेची पूजा केल्याने भक्तांना धन, धर्म, काम आणि मोक्ष सहज प्राप्त होतो. माता कात्यायनीचे रूप तेजस्वी आणि तेजस्वी आहे. त्यांना चार हात आहेत. उजव्या बाजूचा वरचा हात अभयमुद्रामध्ये राहतो. खालचा हात वराच्या मुद्रेत आहे. माता कात्यायनीने वरच्या डाव्या हातात तलवार धारण केली आहे आणि खालच्या हातात कमळाचे फूल आहे. धार्मिक श्रद्धेनुसार जो कोणी कात्यायनी देवीची पूर्ण भक्तिभावाने उपासना करतो. त्याला सर्वोच्च पदाची प्राप्ती होते. येथे जाणून घ्या माँ कात्यायनीची पूजा पद्धत, आरती, मंत्र आणि आवडते नैवेद्य...

## माँ कात्यायनीच्या पूजेची पद्धत

» नवरात्रीच्या सहाव्या दिवशी सकाळी स्नान करून देवीला गंगाजलाने स्नान करावे. नंतर देवी कात्यायनीचे ध्यान करा आणि तिच्यासमोर धूप दिवा लावा. आईला रोळीने टिळक लावा, अखंड अर्पण करा आणि तिची पूजा करा. या दिवशी कात्यायनी मातेला जास्वंद किंवा लाल रंगाची फुले अर्पण करावीत. शेवटी माँ कात्यायनीची आरती करून क्षमा मागावी.



## मां कात्यायनी प्रिय भोग

» या दिवशी कात्यायनी मातेच्या पूजेत मध अर्पण करावा. यामुळे देवी माता प्रसन्न होते आणि भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात. या देवी सर्वभूतेषु मां कात्यायनी ही संपूर्ण संस्था आहे.

नमस्तेस्ये नमस्तेस्ये नमस्तेस्ये नमो नमः ।
चंद्र हसोज्ज्वल्कारा शार्दुलावर वाहन.
कात्यायनी शुभंदाद्या देवी दैत्य घटिनी ।

# मसूदने 1524 दिवसांचा दुष्काळ संपवला!

## दुसरे जलद शतक झळकावत टीकाकारांना दिले चोख प्रत्युत्तर

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**इंग्लंड आणि पाकिस्तान यांच्यातील तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेला सुरुवात झाली आहे. पाकिस्तानचा कर्णधार शान मसूदचे वेगळे रूप मुलतान स्टेडियमवर खेळल्या जात असलेल्या पहिल्या सामन्यात पाहायला मिळाले, जिथे त्याने आपल्या संघाचे नेतृत्व करताना कारकिर्दीतील सर्वात जलद शतक झळकावले. या सामन्यात पाकिस्तान संघाची सुरुवात खराब झाली होती, गस ॲटकिन्सनने सॅम अयुबला लवकरच पॅव्हेलियनमध्ये पाठवले होते, परंतु यानंतर मसूदने अब्दुल्ला शफीकच्या साथीने डाव सांभाळला आणि दुसऱ्या विकेटसाठी २०० हून अधिक धावांची भागीदारी केली.**



या शतकासह त्याने बांगलादेशविरुद्ध मायदेशात कसोटी मालिका गमावल्यानंतर टीका करणाऱ्या टीकाकारांना चोख प्रत्युत्तर दिले आहे. कर्णधार शान मसूदने १०२ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. हे त्याच्या कारकिर्दीतील हे पाचवे शतक आहे. मसूदच्या खेळीत दहा चौकार आणि दोन षटकारांचा समावेश होता. १५२४ दिवसांनंतर मसूदचे हे पहिले शतक आहे. विशेष म्हणजे त्याने शेवटचे शतकही इंग्लंडविरुद्धच झळकावले होते, जे त्याने २०२० मध्ये मँचेस्टरमध्ये झळकावले होते. मसूदने आतापर्यंत अनेक चढ-उतार पाहिले आहेत. कारण तो बराच काळ पाकिस्तान संघातून आत-बाहेर झाला होता. दरम्यान, आता त्याला कर्णधारपदाची अतिरिक्त जबाबदारीही स्वीकारावी लागली आहे.शान मसूदने इंग्लंडला सुरुवातीच्या विकेट्सचा फायदा घेऊ दिला नाही. त्याने खेळपट्टीवर तळ ठोखते मैदानाच्या चारही दिशेला फटकेबाजी करत धावा केल्या. शानने या शतकासह इतिहास लिहिला आहे. तो पाकिस्तानसाठी मिसबाह उल हकनंतर सर्वात वेगवान शतक झळकावणारा दुसरा खेळाडू ठरला आहे. मिसबाह उल हकने २०१४ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध ५६ चेंडूत शतक झळकावले होते. शान मसूदने आता पाकिस्तानचा कर्णधार म्हणून दुसरे जलद शतक झळकावण्याचा विक्रमही आपल्या नावावर केला आहे. या यादीत मिसबाह पहिल्या स्थानावर आहे. विशेष म्हणजे, जेव्हा मिसबाहने कसोटी क्रिकेटमध्ये संयुक्त सर्वात वेगवान शतक ठोकण्याचा विक्रम केला तेव्हा त्याने महान क्रिकेटपटू व्हिव्ह रिचर्ड्सच्या विक्रमाची बरोबरी केली होती.सामन्याबद्दल बोलायचे तर पाकिस्तान नाणेफेक जिंकून फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसरार पाकिस्तान संघाने पहिल्या डावात ७४ षटकानंतर ३ बाद २९८ धावा केल्या आहेत. कर्णधार शान मसूदने दीडशतक झळकावून बाद झाला. त्याने १७७ चेंडूचा सामना करताना १३ चौकार आणि २ षटकाराच्या मदतीने १५१ धावांचे योगदान दिले. अब्दुल्ला शफीक आणि शान मसूद यांची २५३ धावांची भागीदारी ॲटकिन्सनने मोडली. शफीकने १८४ चेंडूत १० चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने १०२ धावांची खेळी साकारली. सध्या बाबर आझम (२१) आणि सौद शकील (१५) धावांवर नाबाद आहेत.मसूदच्या खेळीत दहा चौकार आणि दोन षटकारांचा समावेश होता. १५२४ दिवसांनंतर मसूदचे हे पहिले शतक आहे. विशेष म्हणजे त्याने शेवटचे शतकही इंग्लंडविरुद्धच झळकावले होते, जे त्याने २०२० मध्ये मँचेस्टरमध्ये झळकावले होते. मसूदने आतापर्यंत अनेक चढ-उतार पाहिले आहेत. कारण तो बराच काळ पाकिस्तान संघातून आत-बाहेर झाला होता. दरम्यान, आता त्याला कर्णधारपदाची अतिरिक्त जबाबदारीही स्वीकारावी लागली आहे.शान मसूदने इंग्लंडला सुरुवातीच्या विकेट्सचा फायदा घेऊ दिला नाही. त्याने खेळपट्टीवर तळ ठोखते मैदानाच्या चारही दिशेला फटकेबाजी करत धावा केल्या. शानने या शतकासह इतिहास लिहिला आहे. तो पाकिस्तानसाठी मिसबाह उल हकनंतर सर्वात वेगवान शतक झळकावणारा दुसरा खेळाडू ठरला आहेया यादीत मिसबाह पहिल्या स्थानावर आहे. विशेष म्हणजे, जेव्हा मिसबाहने कसोटी क्रिकेटमध्ये संयुक्त सर्वात वेगवान शतक ठोकण्याचा विक्रम केला तेव्हा त्याने महान क्रिकेटपटू व्हिव्ह रिचर्ड्सच्या विक्रमाची बरोबरी केली होती.सामन्याबद्दल तर पाकिस्तान नाणेफेक जिंकून फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसरार पाकिस्तान संघाने पहिल्या षटकानंतर ३ बाद २९८ धावा केल्या आहेत.

### कारकिर्दीतील सर्वात जलद शतक

अब्दुल्ला शफीक आणि शान मसूद यांची २५३ धावांची भागीदारी ॲटकिन्सनने मोडली. शफीकने १८४ चेंडूत १० चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने १०२ धावांची खेळी साकारली. सध्या बाबर आझम (२१) आणि सौद शकील (१५) धावांवर नाबाद आहेत.इंग्लंड आणि पाकिस्तान यांच्यातील तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेला सुरुवात झाली आहे. पाकिस्तानचा कर्णधार शान मसूदचे वेगळे रूप मुलतान स्टेडियमवर खेळल्या जात असलेल्या पहिल्या सामन्यात पाहायला मिळाले, जिथे त्याने आपल्या संघाचे नेतृत्व करताना कारकिर्दीतील सर्वात जलद शतक झळकावले.

# जयसूर्याची श्रीलंका संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी

## कार्यकाळ 1 ऑक्टोबर 2024 पासून ते 31 मार्च 2026 पर्यंत असणार

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत, इंग्लंड आणि न्यूझीलंडविरुद्धच्या श्रीलंका संघाच्या शानदार कामगिरीनंतर माजी कर्णधार सनथ जयसूर्याची श्रीलंका पुरुष क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सनथ जयसूर्याची नियुक्ती १ ऑक्टोबर २०२४ पासून ते ३१ मार्च २०२६ पर्यंत करण्यात आली आहे.**



नुकतेच श्रीलंकेच्या क्रिकेट संघाने घरच्या मैदानावरील कसोटी मालिकेत न्यूझीलंडचा २-० ने क्लीन स्वीप केला होता. गेल्या काही काळापासून श्रीलंकन संघाच्या या कामगिरीत कमालीचे सातत्य दिसून येत आहे. सनथ जयसूर्याने संघाच्या प्रशिक्षकपदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून संघाची कामगिरी उत्कृष्ट राहिली आहे.या काळात श्रीलंकेने एकदिवसीय मालिकेत भारताचा पराभव केला, त्यानंतर इंग्लंडला त्याच्याच भूमीवर कसोटी सामन्यात पराभूत केले आणि आता न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिका जिंकली. त्यामुळे आता सनथ जयसूर्याची श्रीलंकेचा पूर्णवेळ प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. श्रीलंका क्रिकेटच्या एका निवेदनानुसार, "श्रीलंका क्रिकेटच्या कार्यकारी समितीने भारत, इंग्लंड आणि न्यूझीलंडच्या नुकत्याच झालेल्या दौऱ्यांवरील संघाची चांगली कामगिरी लक्षात घेऊन हा निर्णय घेतला, जिथे सनथ जयसूर्या हंगामी मुख्य प्रशिक्षक म्हणून संघासोबत होता."मुख्य प्रशिक्षक म्हणून जयसूर्याची पहिली जबाबदारी वेस्ट इंडिजविरुद्धचे मर्यादित षटकांचे सामने असतील, जे डंबुला आणि पल्लेकेले येथे खेळले जातील. जयसूर्या यापूर्वी श्रीलंका क्रिकेटचा सल्लागार होता. जुलैमध्ये प्रथमच त्याची हंगामी मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

### सनथ जयसूर्याची क्रिकेट कारकीर्द

गेल्या काही महिन्यांत जयसूर्याच्या मार्गदर्शनाखाली, श्रीलंकेने २७ वर्षांत भारताविरुद्ध पहिली द्विपक्षीय एकदिवसीय मालिका जिंकली. त्याचबरोबर १० वर्षांत प्रथमच इंग्लंडला त्यांच्याच भूमीवर कसोटी सामन्यात पराभूत केले. १९९१ ते २००७ पर्यंत, सनथ जयसूर्याने ११० कसोटी सामने खेळले आणि ४०.०७ च्या सरासरीने ६९७३ धावा केल्या, ज्यात १४ शतके आणि ३१ अर्धशतकांचा समावेश आहे.